☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)

# चोरीच्या गुन्हयातील दहा आरोपींना अटक
# सावली पोलीस ठाणेची धडाकेबाज कामगिरी

पोलीस स्टेशन सावली येथे दि. ०१/०७/२०२० रोजी फिर्यादी नामे १)अमोल गजानन नाडेमवार, धंदा विद्युत ठेकेदार रा. सावली प्रभाग कं. १७ ता. सावली जि.चंद्रपुर २) लव शंकरराव गौरकार, धंदा नोकरी रा. सम्यक नगर कॉलनी सावली ता. सावली जि.चंद्रपुर यांनी पो.स्टे. ला येवुन तक्रार दिली कि, अज्ञात चोरांनी नवीन विद्युत खांबावर लावलेली तार अंदाजे ४ किलोमिटर अंतरावरील चोरुन नेली आहे. अश्या रिपोर्ट वरुन अनुक्रमे अप कं. १३५/२०२० कलम ३७९ भादवी, अप कं. १३६/२०२० कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हे नोंद करुन तपासात घेतले. गुन्हे नोंद होताच तात्काळ सदर प्रकरणाची दखल घेत तपासाची चक्रे वेगाने फिरवुन गुन्हयातील आरोपीचा शोध घेतला असता, गुन्हयातील ४ आरोपींना लागलीच तात्काळ अटक करण्यात आली, व दोन्ही गुन्हयातील चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल electric Conducters ५,००,०००/—रु आरोपीकडुन जप्त करण्यात आला आहे.

तसेच आज रोजी गुन्हयातील ईतर ६ असे एकुण १० आरोपी अटक करण्यात आली असुन आरोपीतांनकडुन ३ मोटर सायकल , ५ मोबाईल , गुन्हयात वापरलेले चारचाकी वाहन चोरी गेलेली अल्युमिनीयम तार गुन्हयात वापरलेले कटर व झुला असा एकुण ८,३०,५००/— किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे सदर आरोपीतांना मा. न्यायालयाने दि.०६/०७/२०२० रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड दिली आहे. तसेच आरोपीतांकडुन आणखी चोरीचे गुन्हें उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरच्या गुन्हयाचा उलगडा मा. पोलीस अधीक्षक डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस अधीक्षक श्री. अनुज तारे यांचे मार्गदर्शनाखाली सावली पोलीस ठाणेचे ठाणेदार कुमारसिंग राठोड याचें नेतृत्वात सहा. फोजदार लक्ष्मण मडावी, पोहवा धमेंद्र मुन चालकपोहवा नारायण सिडाम, नापोशि दर्शन लाटकर , पोशि सुमीत मेश्राम व दिपक डोंगरे यांनी केला आहे.